# पौलासारखे नव्या पाळकांना मार्गदर्शन करा

## नवीन पुढान्यांना, येशू व त्याच्या शिष्यांनी दिले तसे प्रत्यक्ष कामावर प्रशिक्षण द्या.

मुलांना शिवणूायांनी E2b हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना:** ''प्रिय देवा, तुझे वचन लोकांकडे घेऊन जाण्यास आणि त्यांच्या पुढायांना, पौलाप्रमाणे, ते असतील तिथे जाऊन प्रशिक्षण देण्यास आमचे साहाय्य कर.''



**ऐका!** मार्गदर्शन करणारा प्रथम त्याच्या प्रशिक्षणार्थीचे म्हणणे ऐकतो आणि त्यांच्या मंडळीच्या गरजा जाणून घेतो. मग मत्तय 13:52 ह्या वचनात सांगितल्या प्रमाणे, मार्गदर्शन करणारा आपल्या पोतडीतून प्रत्येकाच्या मंडळीच्या सध्याच्या गरजांनुसार निरनिराळे पाळकीय अभ्यासक्रम सोडविण्यास देतो.

1. **देवाच्या वचनातून तुमच्या अंत:करणाची व मनाची तयारी करा.**

**पाहा तीत 1:5** मध्ये तीतने क्रेतमध्ये काय करावे अशी पौलाची इच्छा होती.

*(उत्तर : तीतने प्रत्येक गावातील उणीवा दूर करण्यासाठी मंडळयांची काळजी-देखभाल करण्याकरीता वडीलजनांची नेमणूक केली. तीतला वडीलजनांना पाळकीय सेवेचे प्रशिक्षण देण्याची तयारी करता यावी यासाठी त्याला क्रेतमध्ये सोडण्यापूर्वी पौलाने त्याला मार्गदर्शन केले.)*

**पाहा 2 इतिहास 17:3-9 मध्ये** देवाचे वचन 'विस्तारित' शिक्षणाच्या द्वारे देण्याचे उदाहरण.

- यहोशाफाट राजाने शिक्षकांचे गट केले आणि हे शिक्षक देवाचे वचन घेऊन गावोगांव गेले. वचनाची उणीव असणूाया ठिकाणी जाऊन ते शिकवले.
- हे शिक्षक, लोकांना एखादया मध्यवर्ती केंद्रात बोलावण्यापेक्षा लोक जिथे होते तिथेच गेले आणि त्यांना शिक्षण दिले. आजही, ख्रिस्तातील विश्वासणूायांच्या मंडळया बहुगुणित करण्यासाठी, ही पद्धत फारच उपयुक्त आहे.
- आधुनिक काळात शिक्षक नवीन ख्रिस्ती पुढायांना दोन वेगवेगळया पद्धतींनी शिकवतात.

  1) पारंपारिक पद्धतीने वर्गात बसून मोठया गटाला माहिती सांगून शिकवणे.

  2) येशू व त्याच्या शिष्यांनी केले त्याप्रमाणे लहान गटाशी आपुलकीचे नाते जोडून मार्गदर्शन करणे.
- सेवक परिपक्व-जुणे-जाणते असतील आणि सुस्थापित मंडळया ज्यांच्या कडे तत्काळ लक्ष पुरविले पाहिजे अशा तातडीच्या गरजा नसतात, अशाच वेळी पारंपारिक पद्धतीने वर्गात बसून शिक्षण देणे प्रभावी ठरते.
- येशूने व शिष्यांनी ज्या पद्धतीने नव्या पुढायांना प्रशिक्षण दिले त्या पद्धतीने उमेदवारांना मार्गदर्शन केल्यास ते अधिक प्रभावी ठरेल. नवीन मंडळया आणि गटांमध्ये अनुभवी विश्वासणारे तसेच पुढारी नसतात त्यामुळे त्यांच्या तातडीच्या गरजा जाणून घेऊन त्या पूर्ण केल्यास ते अधिक योग्य ठरेल.
- नवीन मंडळया व नेत्यांच्या तातडीच्या गरजा पाहिल्या तर त्यांची तुलना नवजात बालकांशीच करता येईल. त्यांच्यात अद्याप कोणती उणीव आहे हे त्यांच्याशी बोलून समजून घेण्यास आणि त्यानुसार त्यांना शिक्षण देण्याकरीता एखादया अधिक अनुभवी व्यक्तीची गरज आहे.

**पाहा 2 तीमथ्य 2:2** मध्ये पौलाच्या मार्गदर्शनाच्या 'साखळीतील' चार दुवे. चार दुवे पुढीलप्रमाणे आहेत:

1) **पौल** ज्याने ह्या मार्गदर्शनपर सूचना लिहिल्या. त्याला अंत्युखियायेथील मंडळीने पाठवले होते (प्रे. कृ. 13:1-3).

2) **तीमथ्य** ह्याने ह्या मार्गदर्शनपर सूचना स्वीकारल्या आणि इतरांना प्रशिक्षण देण्यासाठी तो इफिसमध्ये राहिला (1 तीमथ्य 1:1-5).

3) **विश्वासू व्यक्ती** ह्यांनी इफिस व आसपासच्या भागातून तीमथ्याकडून प्रशिक्षण घेतले. एपफ्रास हा त्यापैकीच एक, पुढे त्याने कलस्सै येथीले नव्या मंडळीचे पाळकपण केले (कलस्सै. 4:12-13).

4) **'इतरही'** जसे एपफ्रासने हेरापलीतील लोकांचे मार्गदर्शन केले (कलस्सै. 4:12-13).

ही पुनरुत्पती अशीच सुरु राहावी याकरीता आम्ही **नव्या करारातील मार्गदर्शक तत्वांचा** आधार घेतो.

- **मंडळया-नव्या** मंडळया सुरु करण्यसाठी आपल्या 'प्रेषितांना' पाठवत असत. हे 'पाठवलेले' प्रेषित म्हणजे इफिस 4:11-12 मध्ये देवाने प्रत्येक मंडळीला दिलेले अभिवचन होय.
- **पाळक**-पौलाने 2 तीमथ्य 2:2 मध्ये लिहिल्याप्रमाणे विनाविलंब नव्या पाळकांना प्रशिक्षण देतात.
- **प्रशिक्षण**-(मार्गदर्शक).

1) आपल्या प्रशिक्षणार्थींनी घेतलेले शिक्षण मंडळीमध्ये तत्काळ प्रत्यक्ष आचरणात आणवे. भविष्यात संधी मिळेल अशा अंधुक अस्पष्ट आशेची वाट बघत बसू नये (याकोल 1:22;2 तीमथ्य 2:16-17).

2) देखभाल करणारे वडीलजन होण्यसाठी एखादया व्यक्तीला फक्त नव्या करारातीलच आवश्यकता पूर्ण कराव्या लागतील. त्यात मानव निर्मित आवश्यकतांची भर घालायची नाही. यातून ज्यांना देवाने मंडळीचे पाळकपण करण्याचे कृपादान दिले आहे अशांना वगळावे (तीत 1:5-9).

- **प्रशिक्षाणार्थी** (पाळकीय सेवेचे शिक्षण घेणारे विद्यार्थी).

1) आपल्या मार्गदर्शकांबरोबर ठरवले असेल त्याप्रमाणे त्या योजना तुमच्या मंडळीमध्ये तत्काळ अमंलात आणा.

2) नवीन मंडळयांची पुनरुत्पत्ती सुरु राहावी यासाठी नव्या प्रशिक्षणार्थींना लगेचच मार्गदर्शन करण्यास सुरुवात करा. नवीन मंडळया सुरु करण्यासाठी सेवकांनी-पाळकांनी कायम आपली मंडळी सोडून राहिले पाहिजे असे नाही. प्रे.कृ. अध्याय 13 व 14 मध्ये नमूद केल्यानुसार पौल व बर्णबाप्रमाणे त्यांनाही आपल्या स्त:च्या मंडळीकडे परत येता येईल.

## 2. मंडळी पुढील आठवडयात काय करणार आहे याबद्दल सहकाूयांशी चर्चा करुन योजना आखा.

- तुम्ही राहता त्याच्या आसपास कोणत्या मंडळयांना देखभालीची गरज आहे त्याचा शोध घ्या. प्रत्येक मंडळीच्या गरजांनुसार त्यांची काळजी घेण्यास तीताने पाळकीय सेवा करणारे वडीलजन नेमून त्यांना मार्गदर्शन केले.
- एखाद्या मंडळीसाठी नव्या पुढायांना कोणीही प्रशिक्षण देत नसेल-तर मग ते काम कोणी करावे हे प्रार्थनापूर्वक ठरवा.
- तुम्ही ज्या लोकांना किंवा इतर पाळकांना पुढारी म्हणून प्रशिक्षण देणार आहात त्यांच्याशी बोला. पौलाने तयार केल्या तशा साखळया तयार करण्यासाठी प्रशिक्षण देण्याची तयारी करा. यातून लवकरच पुढे अनेक दुवे-जोड तयार होतील.
- नवीन प्रशिक्षणार्थींना आपले स्वत:चे कुटुंबिय आणि जवळचे मित्रमंडळी ह्यांचे पाळकपण करळयाची सुरुवात लगेचच करण्यास मदत करा.

## 3. सहकाूयांशी चर्चा करुन येणाूया उपासनासभेचे कार्यक्रम ठरवा.

सध्याच्या गरजा व स्थानिक रिवाजांनुसार कार्यक्रम निवडा. यहोशाफाटच्या शिक्षकांचा कथा-वृत्तांत सांगून भाग 1 मध्ये दिलेले मुद्दे **स्पष्ट करुन सांगा.**

पौलाने तीताला क्रेतमध्ये राहण्यास का सांगितले ते **स्पष्ट करा** आणि तुमच्या मंडळीतील मार्गदर्शकांना तीतासारखी सेवा कशा प्रकारे करता येईल.

2 तीमथ्य 2:2 मधील मार्गदर्शकाची साखळीतील चार दुवे आणि अशाच प्रकारची पुनरुत्पत्ती करण्यास देव तुमच्या मंडळीलाही साहाय्य करील, हे **स्पष्ट करा.**

तुम्ही आठवडयामध्ये ठरवलेले कार्यक्रम जाहिर करुन त्याबद्दलचे स्पष्टीकरण करा.

मुलांनी प्रौढांसमोर सादर करण्यासाठी तयार केलेले कार्यक्रम कविता, नाटिका व प्रश्न त्यांना **सादर करण्यास सांगा.**

दोन किंवा तीन जणांचे **गट तयार करा.** एकमेकांसाठी प्रार्थना करुन उत्तेजन द्या तसेच कार्यक्रमांची योजना आखा.

**प्रभुभोजनाची ओळख करुन देण्यसाठी 1 करिंथ. 11:34**

करिंथकर प्रभुभोजनाचा विधी. करीत तेव्हा ते रोजचे जेवणही घेत आणि केव्हा केव्हा आध्यात्मिक गोष्टींपेक्षा जेवण-भोजन याच गोष्टींवर अधिक लक्ष पुरवले जात असे. त्यांच्यासारखाच आम्ही देखील ह्या अत्यंत पवित्र अशा विधीमध्ये येशूच्या समक्षतेचा आदर करणे अगत्याचे आहे.

पौलाने केले तसे मार्गदर्शन विश्वासणायांना कशा प्रकारे मिळाले याबद्दलच्या साक्षी ऐका.

**कविता :** शत्रू आपले हात चोळत बसतो आणि हळूहळू आपले हातपाय पसरतो शिक्षकांच्या मनात संशयाचे जाळे विणतो, शिक्षणाचा दुरुपयोग करतो!

तो नाक मुरडत विकट हास्य करतो आणि जळते बाण सोडतो.

यालाच तो 'मानवी बुद्धी' म्हणतो. स्त:ला शहाणे समजणायांवर तो हल्ला करतो!

**पाठ करा** तीत 1:5

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net